# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत
# अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळयाला प्रारंभ

पनवेल (वार्ताहर) कामोठे येथील विठ्ठल रखूमाई सांप्रदायिक सेवा मंडळाच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळयाला लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत आजपासून (दि.२२) प्रारंभ झाले.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते यावेळी विठ्ठल रखुमाई प्रतिमेचे आणि ग्रंथराज ज्ञानेश्वरीचे पूजन तसेच दीप प्रज्वलन करून या सोहळयाची सुरूवात झाली. याप्रसंगी कामोठे ग्रामपंचायतीचे सदस्य प्रमोद भगत, माजी ग्रामपंचायत सदस्य गोपीनाथ भगत, तालुका कॉंग्रेसचे उपाध्यक्ष दिलीप म्हात्रे, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे कामोठे शहर अध्यक्ष रमेश गोवारी, कामोठे युवक कॉंग्रेसचे अध्यक्ष रमेश तुपे, मागासवर्गीय सेलचे जिल्हा उपाध्यक्ष बबन गडवे, तालुका संघटक अविनाश पालकर, कामोठे शहर उपाध्यक्ष हनुमंत यादव, दत्तात्रय सावंत, महिला कॉंग्रेसच्या तालुका उपाध्यक्षा माया आहिरे, कामोठे शहर अध्यक्षा दिक्षा जगताप, उपाध्यक्षा अंकिता पालकर, मिना नांदोस्कर, विठ्ठल रखुमाई सांप्रदायिक सेवा मंडळाचे संस्थापक अध्यक्ष रविंद्र गवळी, सप्ताह कमिटी उपाध्यक्ष ह.भ.प.रविंद्र देशमुखबुवा, सचिव ह.भ.प.गोरक्षनाथ महाराज घाडगे, खजिनदार भास्कर घोगरे, प्रविण घार्गे, मंडळाचे पदाधिकारी, सदस्य, वारकरी सांप्रदायातील मंडळी आणि नागरिक उपस्थित होते.

दि.२२ ते २६ जानेवारीपर्यंत कामोठे मधील श्री गणेश मैदानात चालणाऱ्या या सोहळयात काकड आरती, प्रवचन, किर्तन, भजन, हरिजागर, भव्य दिंडी सोहळा व दिपोत्सव, भजनसंध्या, अहमदनगर येथील ह.भ.प.पारस महाराज मुथा यांचे काल्याचे किर्तन, महाप्रसाद असे विविध कार्यक्रमे होणार आहेत.